अनुकंपा प्रतिक्षासूचीतील जेष्ठतेनुसार
नियुक्ती देणेबाबत करावयाची कार्यवाही.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : अकंपा -१२२०/प्र.क्र.१६७/का-८**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०६ जानेवारी, २०२१

वाचा : शासननिर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/का-८ , दिनांक : २१.०९.२०१७

**प्रस्तावना:-**

संदर्भाधिन दिनांक २१.९.२०१७ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट- अ येथील अ.क्र. २० येथे मागासवर्गीयांसाठी आरक्षित ठेवलेल्या पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्ती देताना करावयाच्या कार्यवाहीबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यामधील (ब) येथे “प्रतिक्षासूचित कनिष्ठ क्रमांकावर मागास प्रवर्गाचा उमेदवार असला तरी त्यास जेष्ठता क्रम डावलून खुल्या प्रवर्गाच्या जेष्ठ उमेदवारांना नियुक्ती देण्यापूर्वी आरक्षित पदावर नियुक्ती देता येणार नाही. खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्ती दिल्यानंतर जेव्हा आरक्षित प्रवर्गाच्या उमेदवाराचा प्रतिक्षासूचितील जेष्ठतेनुसार क्रम येईल तेव्हाच त्याची नियुक्ती आरक्षित पदावर करणे आवश्यक आहे. तथापि,मागासवर्गीय उमेदवारास प्रतिक्षासूचिवरील जेष्ठता क्रमानुसार अनुकंपा नियुक्ती देण्याच्यावेळी त्या उमेदवाराच्या मागास प्रवर्गाचे पद उपलब्ध नसले तरी त्यांना खुल्या प्रवर्गाच्या उपलब्ध पदावर नियुक्ती देण्यात यावी.” असे नमुद केले आहे.

०२. सदर तरतुदीच्या अनुषंगाने काही कार्यालयांकडून अशी विचारणा होत आहे की, प्रतिक्षासूचितील जेष्ठ उमेदवार उपलब्ध असलेल्या अनुकंपा पदासाठी अर्हता धारण करत नाही तथापि त्याच्या नजीकचा कनिष्ठ उमेदवार हा सदर पदासाठीची अर्हता धारण करीत असूनही सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधिन शासन निर्णयातील परिशिष्ट- अ येथील अ.क्र. २०(ब) नुसार प्रतिक्षासूचितील जेष्ठ उमेदवारांस डावलून त्याच्या खालील कनिष्ठ उमेदवारास नियुक्ती देता येत नाही. त्या अनुषंगाने मार्गदर्शन करण्याची विनंती प्राप्त झाली आहे. त्यानुसार प्रचलित धोरणाच्या अनुषंगाने अधिक स्पष्टता आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

सदर शासन परिपत्रकाद्वारे प्रतीक्षासूचीतील जेष्ठतेच्या क्रमानुसार नियुक्ती देण्याबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शनकरण्यात येत आहे :-

शासन धोरणानुसार अनुकंपा नियुक्ती देताना शासनाच्या शासन निर्णय दि. २१.९.२०१७ च्या सूचनांचे पालन करावे. सर्वसाधारणपणे प्रतिक्षासूचीतील जेष्ठतेनुसार अनुकंपा नियुक्ती देण्यात यावी. तथापि, प्रतिक्षासूचीतील जेष्ठ उमेदवार हा अनुकंपा नियुक्तीच्या पदासाठीची अर्हता धारण करीत नसेल व त्याखालील नजीकचा कनिष्ठ उमेदवार संबंधित पदासाठीची अर्हता धारण करीत असेल तर केवळ अशा वेळेस त्या कनिष्ठ उमेदवारास प्रतिक्षासूचीतील जेष्ठ उमेदवाराची जेष्ठता डावलून अनुकंपा नियुक्ती देण्यात यावी. मात्र अशी नियुक्ती देताना प्रतिक्षासूचीतील ज्येष्ठ उमेदवार अनुकंपाद्वारे नियुक्तीसाठी त्या संबंधित पदासाठी अर्हताधारक नाही, याची नियुक्ती प्राधिकाऱ्याने खात्री करावी.

०२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२१०१०६१६५५४५६२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Geeta Rahul Kulkarni

Digitally signed by Geeta Rahul Kulkarni
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=87e2e317e0d978442ac6b599d6a0abcf73fe717ee52994443a8509075101cc93, serialNumber=92d474843b842720200d1a10946d5fc9348b9450f867605a47d177207c9bd384, cn=Geeta Rahul Kulkarni
Date: 2021.01.06 17:02:35 +05'30'

**(गीता रा. कुलकर्णी)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई,
५. सर्व सन्माननीय संसद सदस्य,
६. विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य,
७. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,
८. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
९. सर्व मंत्रालयीन विभाग,
१०.प्रबंधक मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
११.प्रबंधक अपिल शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१२.प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१३.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
१४.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
१५.सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, (विधानपरिषद), मुंबई,
१६.सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासन भवन, मुंबई,
१७.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र,मुंबई,
१८.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र,मुंबई,
१९.महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र,मुंबई,
२०.महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र,मुंबई,
२१.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२२.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२३.मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे), कोकण भवन, नवी मुंबई,
२४.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई, (२ प्रती प्रसिध्दीकरिता)
२५.सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी,
२६.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२७.निरनिराळया मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
२८.सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२९.सामान्य प्रशासन विभाग/का-३९, (महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरिता)
३०.निवडनस्ती (कार्यासन-८).